

प्रेरणास्थान
श्री. सुरेशदादा जैन

SEED
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री प्रेमाबाई जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

**आमचे ध्येय:**
गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये
शैक्षणिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून
त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.

वर्ष ८|अंक २२|जानेवारी–एप्रिल २०१९



# करिअर नियोजन

*उज्ज्वल भवितव्यासाठी...*



# करिअरची निवड करतांना...



अध्ययन अनुभव माणसाला विशिष्ट विचार देतात. त्या विचारांच्या शिदोरीवर ती व्यक्ती आयुष्यातल्या महत्वाच्या बाबींसंबंधी दिशा ठरवू शकते. सर्वसाधारणपणे औपचारिक शिक्षणाने व्यवसाय किंवा नोकरीच्या संधी उपलब्ध होत असतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या आवडीनुसार त्याची वाट निवडीत असतो परंतु काही लोकांना वेगळ्या वाटा खूणावत असतात. त्यांना सरधोपट मार्गाने न जाता वेगळा प्रवाह निर्माण करायचा असतो किंवा तो घडविण्यास ते उत्सुक असतात. अशा वेगळ्या वाटेनं जाणाऱ्या गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना साथ मिळते एसडी–सीडची.

खान्देशात आदरणीय सुरेशदादांच्या रूपाने एक कर्तृत्ववान व झुंझार नेतृत्व उदयास आले परंतु त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे ते एक सृजनशील व्यक्तिमत्व. प्रत्येकाच्या अडीअडचणी जाणून घेवून त्यावर मार्ग काढण्यास मदत करण्याचे संस्कार त्यांच्यावर झाले त्यामुळे ते आपल्या आयुष्यात सत्कर्म करत आहेत. दान–देणगी तर अनेकजण देतात पण आदरणीय दादांनी आपल्या खान्देशच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी केवळ आर्थिक अडचणींमुळे वंचित राहू नये यासाठी दातृत्वाचे दालन खुले केले जे आहे एसडी–सीड.

ही शिष्यवृत्ती स्वीकारण्यापूर्वी आपण करत असलेल्या अभ्यासक्रमाची निवड त्याला अनुसरून भविष्यात उपयोगी असलेल्या करिअरच्या संधी यांचाही विद्यार्थ्यांनी विचार करणे जरूरीचे आहे त्यासाठीचा हा लेख प्रपंच.

करिअर नियोजन ही अविरत चालणारी प्रक्रिया असून त्या माध्यमातून आपणांस आपल्या अध्ययनास दिशा मिळेल. खरंतर या प्रक्रियेची सुरूवात बालपणापासूनच होते. तुमचं आवडतं क्षेत्र कोणतं? एखादं क्षेत्र का आवडतं किंवा का आवडत नाही? तुम्हाला काय करायला आवडेल? काय आवडणार नाही? बऱ्याचदा तुमच्या आवडीची कामे तुम्ही पूर्वीपासून करीत आलेले असता पण वाढत्या वयानुसार अनुभव समृद्धता व परिपक्वता येते. लहान वयापासून सुरू झालेल्या या प्रश्नांकडे हळूहळू व्यवसायसंधीच्या दृष्टीकोनातून बघताना विविध पैलूंचा आपण विचार करायला लागतो. एखादी कला तुम्हाला अवगत होते तर कधी चौकटीबाहेर विचार करायला लागतात. तंत्रकुशलता येते, आपली नवनवीन गोष्टी शिकण्याची मनिषा, कष्ट करण्याची मानसिकता आपल्या निदर्शनास येत जातात. हे समजून घेत ते अधिकाधिक आत्मसात करता आलं पाहिजे आणि त्याचा उपयोग आपल्या व्यवसाय निवडीसाठी करून घेता येणे गरजेचे आहे. तुमची आवडनिवड, मूल्ये, तुम्हाला अवगत असलेली कौशल्ये, प्राधान्यक्रम आणि अध्यापनासाठीच्या पर्यायांबरोबरच कामाप्रती असलेली तुमची निष्ठा, मेहनत या बाबी तुमच्या करिअर व्यवस्थापनासाठी सहाय्यभूत ठरत असतात.

**करिअर व्यवस्थापनाच्या अनेक पायऱ्या आहेत. त्यापैकी महत्वाच्या चार पायऱ्यांचा इथे उल्लेख करावसा वाटतो.**

१. स्वत:ला ओळखा.
२. बाह्य जगतात प्रवेश करा.
३. निर्णयक्षम बना.
४. कृती करा/विचारांना कृतीची जोड द्या.

### १. स्वत:ला ओळखा –

स्वत:ची ओळख करून घेत असतांना स्वत:शी संवाद साधा. मी कुठे आहे? मला काय हवं आहे? आणि जे हवं आहे तिथपर्यंत मला कसं पोहचता येईल? या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेता–घेता नकळत तुम्हाला तूमची आवड–निवड तसेच तुमच्यातील उपजत कौशल्ये इत्यादींची जाणीव होईल. पुन्हापुन्हा स्वत:शी प्रश्नांची सरबत्ती सुरू ठेवा. मी कुठे आहे? मला नेमके काय हवे आहे? नोकरी की व्यवसाय? मी रोजच्या कामाव्यतिरिक्त काय करू शकतो? मला काय करायला आवडतं? माझी बलस्थाने कोणती? माझ्यासाठी महत्वाचं काय आहे? बघा! शेवटी तुम्हाला तुमच्या कामाची पूर्ण कल्पना आलेली असेल, तुमच्या ध्येयाची पूर्ण जाणीव झालेली असेल. यामुळे वरील प्रश्नांद्वारे तुम्हाला स्वत:ची ओळख तर होईलच शिवाय तुमच्याकडे अनेकविध स्वरूपाची माहिती संकलित होईल, जी तुम्हाला करिअर निवडीसाठी सहाय्यभूत ठरेल.

### २. बाह्य जगतात प्रवेश करा –

वैयक्तिक प्राधान्यक्रम हा उत्तम पर्याय निवडीच्या वेळी मदत करीत असतो. व्यवसाय निवड करतांना आवडीच्या अभ्यासक्षेत्राची निवडही महत्वाची ठरते. तुमच्या व्यवसायसंबंधीचे कार्यक्षेत्र एकदा निश्चित झाले की, त्या अनुषंगाने आवश्यक कला, शास्त्र किंवा तंत्र अशा विविध गोष्टींच्या सहाय्याने व्यक्ती व्यवसायाच्या दृष्टीने नवनवीन शिकण्यास प्रवृत्त होत जाते. तुमच्या काही धारणा, कल्पना किंवा समज–गैरसमज असतील तर तुम्ही तत्संबंधित कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. त्या संबंधीचे शिक्षण व संशोधनही तुम्हाला करता येवू शकतं.

शक्यतो तुमच्या आवडीच्या व्यवसायाची निवड करा. स्वत:ला वारंवार विचारा की, माझी कौशल्ये आणि माझ्या आवडी–निवडी मला माझ्या व्यवसायाशी कशा जूळवून घेता येतील? वृद्धीसाठी मला काही विशेष श्रम घ्यावे लागतील का? किंवा मी आणखी कोणती कौशल्ये शिकली पाहिजे? यानंतर तुम्हाला व्यवसायासंबंधी व त्यासाठीच्या कौशल्यांसंबंधी विपुल माहिती प्राप्त झालेली असेल. पण त्या सगळ्यासाठी बाहेरच्या जगात प्रवेश करण्याची गरज आहे.

### ३. निर्णयक्षम बना –

उपलब्ध पर्यायांपैकी सारासार विचार करून योग्य पर्यायाची निवड करता येणे हा व्यवसाय निवडीतला महत्वाचा टप्पा आहे. स्वत:ला विचारा की आजवरचं माझं उत्तम काम कोणतं? मी घेतलेलं प्रशिक्षण, कौशल्ये, आवडी–निवडी यांच्यात समन्वय कसा साधता येईल? माझी सद्यस्थिती आणि जबाबदाऱ्यांशी ते कसं जुळवून घेता येईल? त्याचे फायदे/तोटे कोणते? यांसारखे प्रश्न तुमच्या व्यवसायातील अनेक गोष्टींची तूम्हाला नव्याने ओळख करून देतील. तसेच या चिंतनातून तुम्हीच तुमच्या ध्येयापर्यंत निश्चित पोहचाल यात शंका नाही.

### ४. कृती करा –

योग्य कौशल्य, व्यवसायाची पूर्ण माहिती, वेळ आणि पैसा यांचा केलेला सदुपयोग. परिपूर्ण व विचारपूर्वक केलेली आखणी आणि त्यानुरूप घेतलेले योग्य निर्णय याला जोड लागते अंमलबजावणीची. शेवटचा टप्पा म्हणजे तुम्ही केलेल्या कृती आराखड्याला कृतीत परावर्तित करण्याची वेळ.

संकलित केलेल्या माहितीच्या आधारे कृती आराखडा तयार करा. स्वत:ला विचारा की, कोणती कृती मला माझ्या ध्येयापर्यंत घेवून जाईल? माझ्या लक्ष्यप्राप्तीमध्ये मला कोणाची मदत मिळवता येईल? आणि मग आजवर केलेलं काम, प्रशिक्षण, संशोधन अभ्यास तुम्हाला निश्चितच उपयुक्त ठरेल. तुम्ही उचित निर्णय घेवून कार्यप्रवृत्त व्हाल. हा टप्पा तुम्हाला आवडीच्या व्यवसायाचे उत्तम निर्णय घेण्यास नक्कीच उपयुक्त ठरेल.

तुम्ही तुमच्या आवडीच्या करिअरची निवड कराल पण एक लक्षात ठेवा... महात्मा गांधी म्हणायचे, ''तुमचे उद्याचे भविष्य हे वर्तमानातील कृतीवर अवलंबून असते.'' तुमच्या यशस्वी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**– डॉ. सौ. गौरी राणे**
एसडी–सीड सल्लागार समिती सदस्य

**या अंकात...**


| | पृष्ठ क्र. |
|---|---|
| 1. संपादकीय | 2 |
| 2. करिअर बदलताय? नियोजन करा | 3 |
| 3. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | 4 |
| 4. मूल्यशिक्षण – काळाजी गरज | 5 |
| 5. 'समर जॉब' का करावा? | 6 |
| 6. गुरूंची शिकवण | 7 |
| 7. लाभार्थ्यांचे मनोगत | 8 |


**ज्ञानयज्ञ संपादक मंडळ**
श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

# करिअर बदलताय? नियोजन करा



आपण स्वप्न पाहिलेल्या कोर्सला प्रवेश घेतल्यानंतर तो कोर्स सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या काही वर्षात वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. खरं तर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली तर विद्यार्थ्यांनी आपल्याला कोर्स का सोडावासा वाटतोय, याचं खरं कारण शोधायला हवं आणि मगच पुढचा निर्णय घ्यायला हवा. कोर्स सुरू होवून अर्ध वर्ष सरल्यानंतर तो सोडून देण्याचा निर्णय घेणं अशा विद्यार्थ्यांसाठी कठीण ठरू शकतो. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास त्या विद्यार्थ्यांनी व्यावसायिक स्तरावर मदत घेणं अधिक फायद्याचं ठरू शकतं. व्यावसायिक मार्गदर्शन घेवून वस्तुनिष्ठ निर्णय घेणं अधिक सोपं होवू शकतं.

इंजिनीअरिंग असो, मेडिसीन असो किंवा सीए, आजही या कोर्सना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड आहे. या कोर्सना प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असतात. या कोर्सना प्रवेश घेण्याची प्रक्रिया खरं तर एक वर्ष आधीच सुरू होते. बारावीनंतर कोणत्याही कोर्सला प्रवेश घेण्यासाठी आता प्रवेश परीक्षा देणं अनिवार्य झालं आहे. बारावीच्या गुणांबरोबरच प्रवेश परीक्षेच्या अग्निदिव्याला तोंड द्यावं लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करणं तर आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर कठोर परिश्रम करणं अत्यावश्यक आहे. या परीक्षा आणि गुणांचं चक्र यशस्वीपणे भेदलं की, प्रवेश प्रक्रियेचा आणखी एक महत्वाचा टप्पा पार पाडावा लागतो.

चांगलं/आवडीचं कॉलेज, विषयांची निवड, वसतिगृहाची सुविधा (गरज पडल्यास) अशा अनेक गोष्टी पार पाडत विद्यार्थी सरतेशेवटी आपल्या ध्येयापर्यंत पोहोचतात आणि एका नवीन आयुष्याला सुरूवात करतात. एकदा का कॉलेज सुरू झालं की, खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या कोर्सबरोबर त्यांची ओळख व्हायला सुरूवात होते. काही विद्यार्थ्यांना आपण निवडलेल्या कोर्समध्ये रस वाटू लागतो, तर काहीजण आपल्याच निर्णयाबाबत साशंक होतात. हा कोर्स यशस्वीपणे पूर्ण करणं आपल्याला जमेल की हा कोर्स सोडून द्यावा असा गोंधळ अनेक मुलांच्या मनात निर्माण होतो.

सीएसारख्या व्यावसायिक कोर्सची निवड करणारे विद्यार्थी एक–दोन प्रयत्नातच हा कोर्स सोडून देण्याचा विचार करू लागतात किंवा आपल्याला हे जमणार नाही अशी त्यांची नकारात्मक मन:स्थिती बनत जाते. काही कोर्सना प्रवेश घेणं कठीण असतं, पण ते यशस्वीपणे पूर्ण करणं (पास होणं) सोपं असतं, तर काही कोर्सेसना प्रवेश घेणं सोपं असतं, पण ते पूर्ण करणं कठीण असतं.

### मध्येच कोर्स सोडून देण्यामागे विद्यार्थ्यांची पुढील काही कारणं असू शकतात.

कोर्सविषयी काही वेगळ्याच अपेक्षा बाळगून असणं, थीअरीमध्ये रस न वाटणं, ॲप्टिट्युड क्षमता नसणं, त्या विषयात रस/आवड नसणं, पालकांच्या किंवा सामाजिक दबावाला बळी पडून कोर्सला प्रवेश घेतलेला असणं, मागण्या पूर्ण करताना अडचणी येणं, कॉलेज किंवा वसतिगृहातील जीवनाशी जुळवून घेता न येणं, शिक्षकांच्या बाबतीत काही समस्या असणं, दुसऱ्याच क्षेत्रात/विषयात रूची निर्माण होणं, इ.

### कोणताही टोकाचा निर्णय घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील गोष्टींचा विचार करायला हवा.

- कोर्स पूर्ण न करण्यामागील आपलं खरं कारण काय याचा वस्तुनिष्ठपणे आणि प्रामाणिकपणे विचार करा.
- समस्येबाबत घरच्यांशी आणि शिक्षकवर्गाशी चर्चा करा. वेळ पडल्यास व्यावसायिक मार्गदर्शक (कौन्सलर)ची मदत घ्या.
- या कोर्सला प्रवेश घेण्यामागील खऱ्या कारणांचा शोध घ्या आणि प्रवेश घेताना आपण एवढे कष्ट का केले, या प्रश्नाचं उत्तर मिळवा. कदाचित यामुळे तो कोर्स न सोडून देण्याचं कारण तुम्हाला मिळेल.
- सहजासहजी हार मानू नका. कोर्स सोडण्याचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी तो पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून जास्तीत जास्त प्रयत्न करून पहा.
- हा कोर्स सोडण्याच्या आणि दुसऱ्या कोर्सला नव्याने प्रवेश घेण्याच्या निर्णयाचा साधक बाधक विचार करा.
- पोस्ट ग्रॅज्युएट स्तरावरही पर्याय उपलब्ध आहेत.

म्हणून विद्यार्थ्यांनो कोर्स सोडण्याचा निर्णय घाईघाईत घेवू नका. असा निर्णय घेण्यापूर्वी यामागचं खरं कारण शोधून त्याचा सारासार विचार करा. आपल्याला खरंच काही समस्या असल्यास त्याचं वस्तुनिष्ठ विश्लेषण करा आणि त्यावर उपाय शोधा.

# एसडी-सीडतर्फे उद्योजकता विकास शिबीरांचे आयोजन

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता वाढावी, त्यांनी उद्योजक होण्याची महत्वाकांक्षा बाळगावी यासाठी एसडी–सीडकडून उद्योजकता विकास शिबिरांतर्गत सातत्याने मार्गदर्शन करण्यात येते. त्याच अनुषंगाने आप्पासाहेब शिवाजीराव पाटील पॉलिटेक्निक, चिंचपूरा आणि त्रिमुर्ती कॉलेज ऑफ फार्मसी, जळगाव या दोन ठिकाणी दोन–दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रातील तज्ञांकडून नवीन व्यवसाय सुरू करण्याच्या प्रक्रियेविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच जिल्ह्यातील यशस्वी उद्योजकांशीदेखील विद्यार्थ्यांना मनमोकळेपणाने संवाद साधता आला ज्याद्वारे व्यवसायासंबंधी असलेल्या त्यांच्या शंकांचे निरसन झाले. एकूण ४०० सहभागी विद्यार्थ्यांनी यापासून प्रेरित होवून अनेकांनी त्यांच्या प्रतिक्रियेतून उद्योजकतेकडे वळण्याची इच्छा दाखविली. त्यापैकी काही प्रतिक्रिया खाली देत आहोत.





“ शिबिराच्या माध्यमातून समजले की, उद्योग सुरू करायला सर्वप्रथम गरज असते ती उद्योजकीय मानसिकतेची. तसेच नवनवीन व्यवसायाच्या टिप्स, त्यातील आव्हाने, उद्योग उभारणीतील अनुभव, उद्योग निवड, सरकारी निमसरकारी योजनांची माहिती, बँकेच्या कर्ज योजना, बाजारपेठ सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल या सर्व गोष्टींची अद्ययावत माहिती यातून मिळाली. आता मी नक्कीच उद्योगक्षेत्राकडे जाण्याचा प्रयत्न करीन. एसडी–सीड मुलांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्यासाठी अतिशय चांगला उपक्रम राबवित आहे आणि असे उपक्रम त्यांनी वारंवार घ्यावेत हीच अपेक्षा. ”

“ साधारण कुटुंबातील मुलं व्यवसायाचा विचार न करता शिक्षण पूर्ण झाले की, नोकरीच्या शोधात असतात पण या शिबिरातून उद्योगक्षेत्रातील उपलब्ध संधींची माहिती होवून मीही व्यवसाय करू शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे जोखीम घेण्याची तयारी ठेवा हे मार्गदर्शन मिळाले. एसडी–सीड अतिशय चांगला उपक्रम राबवित आहे. आमच्यासारख्या सर्वसाधारण मुलांनी नोकरीच्या मागेच न धावता उद्योगक्षेत्राकडेही गेले पाहिजे, उद्योजक बनले पाहिजे हे एसडी–सीडचे जे ध्येय आहे त्याबद्दल त्यांचे आभार. ”

**वरील शिबीराव्यतिरिक्त एसडी–सीडने विद्यार्थीहिताच्या इतर विविध विषयांवर एकूण १८ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले, त्यात २१०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.**

**इंग्रजी संवाद कौशल्य**



**ध्येय निश्चिती व संपादन**



**विविध कौशल्य विकास – 3 कार्यक्रम**



**मुलाखत कौशल्य – 4 कार्यक्रम**



**'स्मार्ट गल' कार्यक्रम – 2 कार्यक्रम**



**वैयक्तिक समुपदेशन – 2 कार्यक्रम**



**करिअर मार्गदर्शन**



**स्मृती आणि एकाग्रता विकास – 2 कार्यक्रम**



**स्वयंशिस्त विकास**



ज्या व्यक्तीला प्रोत्साहन दिले जाते ती अपेक्षेपेक्षा जास्त चांगलं काम करते.



# मूल्यशिक्षण काळाजी गरज

## मूल्य म्हणजे काय?

माणसाचे वर्तन कसे असावे यासंबंधी समाजाने काही आदर्श निर्माण केलेले असतात. हे आदर्श म्हणजेच 'मूल्य' होय. 'मूल्य' या शब्दाने मनोधारणेची विशिष्ट स्थिती किंवा घडण दर्शविली जाते. मनाच्या या विशिष्ट घडणीवरच व्यक्तीचे समाजातील वर्तन अवलंबून असते. इतरांशी सद्भावनेने वागण्यास व्यक्तीला ज्या वृत्तींची मदत होते ते नैतिक मूल्य होय.

## मूल्यशिक्षण म्हणजे काय?

व्यक्ती जीवन जगताना आपले स्वत:चे असे उद्दिष्ट ठरवत असते. त्यामध्ये नैतिक, बौद्धिक अथवा सौंदर्य विषयक दृष्टिकोन दिसून येतो. व्यक्तीला आपण कसे जगायचे याबद्दल जाणीव निर्माण करून देणे आवश्यक असते. मूल्यशिक्षण म्हणजे संस्काराचे शिक्षण होय. ज्या उद्दिष्टांसाठी मनुष्य जीवन जगतो अशी उद्दिष्टे साध्य करणे म्हणजे मूल्यशिक्षण होय.

स्वत:च्या पलीकडे जावून इतरांच्या सुख दु:खाचा विचार करणे, दुसऱ्याच्या सुखाने आनंदित होणे, दुसऱ्याच्या दु:खाने कळवळणे, इतरांचे जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करणे यासाठी काही गोष्टी अंगीकारणे म्हणजेच मानवी 'मूल्यशिक्षण' होय.

## मूल्यशिक्षणाचे महत्व

भारतीय शिक्षणप्रणालीमध्ये मूल्यशिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. पुरातन काळापासून शिक्षणाची निर्मिती व वाटचाल लक्षात घेता मूल्यशिक्षण हाच भारतीय शिक्षणपद्धतीचा आधार आहे असे दिसते.

## मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे व आवश्यकता

विद्यार्थ्यांनी शिक्षणातून ज्ञानात्मक, भावनात्मक व क्रियात्मक विकास साधणे, सर्वांगीण व्यक्तिमत्व घडविणे आणि देशाचे आदर्श नागरिक बनणे यासाठी त्यांच्यामध्ये विशिष्ट मूल्ये संस्कारित करणे आवश्यक आहे. आजचा विद्यार्थी २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभा आहे. विज्ञानयुगातील अनेक आव्हानांना आणि समस्यांना त्याला तोंड द्यायचे आहे. दिवसेंदिवस आवश्यक अशा जीवनमूल्यांचा ऱ्हास होत असल्यामुळे अनेक समस्या वाढत आहेत. त्यामुळे शिक्षणातून जीवनावश्यक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये परिणामकारकरित्या रूजविले जाणे फार महत्वाचे आहे. आज नैतिक शिक्षणावर जास्त भर देण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने व्यक्तिविकासापासून ते विशाल विश्वबंधुत्वाचा दृष्टीकोन तयार करण्यासाठी मूल्यशिक्षणाची खालील उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली.

१. व्यक्ती म्हणून निरोगी आणि निरामय जीवन जगणे व आदर्श नागरिक होणे.
२. कुटुंबातील जबाबदार घटक होणे.
३. परिसरातील आदर्श रहिवासी होणे.
४. सामाजिक बांधिलकी मानणारा समाजातील घटक होणे.
५. स्वतंत्र राष्ट्राचा नागरिक म्हणून जगणे.
६. विश्वबंधुत्वाचा दृष्टीकोन तयार करणे.

मूल्यशिक्षणामुळे व्यक्तीविकास होवू शकतो. सॉक्रेटिसने म्हटल्याप्रमाणे ''स्वत:स ओळखा, स्वत:स समजून घ्या'' या उक्तीप्रमाणे आपले सामर्थ्य आणि मर्यादा लक्षात घेतल्या की, व्यक्तीला स्वत:मध्ये खूप परिवर्तन करता येते. शिक्षणाने व्यक्तीचे विचार, सवयी, वृत्ती यात बदल होतो परंतु हा बदल मुल्यानुरूप असावा म्हणजेच मूल्यवान नागरिक मौल्यवान जीवनाचा उपभोक्ता ठरेल. जीवनातील प्रत्येक काळ, वेळ ही महत्वाची असते. त्या काळाचा, वेळेचा सदुपयोग करून समाजहिताला प्राधान्य दिल्यास आदर्श समाजाची निर्मिती करण्यास निश्चितच मूल्यशिक्षण उपकारक ठरेल.

## विद्यार्थी जीवनातील दहा निवडक मूल्ये

सुसंस्कारातून उद्याचा सुजाण नागरिक निर्माण करणे हे मूल्यशिक्षणाचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांच्या अंत:करणात सद्वर्तन बिंबवून त्यांच्याकडून चांगले वर्तन अपेक्षित आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रमुख आणि आवश्यक अशा खालील दहा निवडक मूल्यांचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे –

| | |
|---|---|
| **१. राष्ट्रीय एकात्मता** | **६. वैज्ञानिक दृष्टिकोन** |
| **२. राष्ट्रभक्ती** | **७. सर्वधर्म सहिष्णुता** |
| **३. वक्तशीरपणा** | **८. स्त्री–पुरूष समानता** |
| **४. नीटनेटकेपणा** | **९. सौजन्यशीलता** |
| **५. श्रम प्रतिष्ठा** | **१०. संवेदनशीलता** |




# करणार ना 'समर जॉब'?

समर जॉबमधून मुलांच्या करिअरला आणि जीवनाला दिशा मिळणार आहे. पैसे कमावण्यापेक्षा त्यांना ज्या क्षेत्रात करिअर करायचं आहे ते क्षेत्र जवळून अनुभवण्याची ही संधी आहे आणि मुख्य म्हणजे त्यांना स्वतःचा शोध घेणं यामुळे शक्य होईल. म्हणूनच पालक आणि मुलांनी समर जॉब करण्यामागचा उद्देश नीट समजून घेणं अतिशय महत्वाचं आहे.

आजची तरुण पिढी आपल्या करिअरविषयक अधिक जागरूक झालेली पाहायला मिळते. कोर्स/अभ्यास करता—करताच कामाचा अनुभव आणि स्वकष्टाची कमाई करता यावी, अशी आज अनेक तरुणांची मानसिकता असते. याच मानसिकतेमुळे समर जॉबचा ट्रेंड गेल्या काही वर्षांपासून आपल्याकडे स्थिरावलाय. आज तरुणांच्या मनात कमी वयापासूनच पैसे कमावण्याची इच्छा घर करतेय. या इच्छेमागे प्रत्येकाचं कारण वेगवेगळं असू शकतं. जसं की, कुणाला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हायचं आहे, तर कुणाला स्वतःच्या पैशातून आपल्या आवडीच्या वस्तू विकत घ्यायच्या आहेत.

शाळा—कॉलेजांना असणाऱ्या सुट्टीच्या या काळात अनेक प्रकारचे जॉब फेअर, इव्हेंट्स होत असतात. अशा फेअर आणि इव्हेंट्समधून समर जॉब करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी प्रयत्न करता येतील. बँका, थेट सेलिंग एजंट, रिसर्च कंपन्या, खासगी कंपन्या, ॲडव्हर्टायझिंग फर्म्स, रिटेल शॉप, मॉल, प्रमोशनल कंपन्या इत्यादि ठिकाणी अशा प्रकारचे समर जॉब मिळण्याच्या खूप संधी असतात.


समर जॉब करण्याचे दोन फायदे या तरुणांना होतात. महत्वाचं म्हणजे कामाचा अनुभव मिळतो आणि दुसरं म्हणजे स्वकमाई. अशा प्रकारे नोकरी करताना कामाच्या ठिकाणचं वातावरण कसं असतं आणि आपण तिथे कसं वागायला हवं याचा अनुभव तरुणांना घेता येतो. एक प्रकारे ही तुमची लिटमस टेस्टच आहे असं म्हणता येईल. व्यावसायिक जीवनाचा दृष्टिकोन व्यापक करणारा असा अनुभव तुम्हाला समर जॉबमधून मिळतो. समर जॉब मिळवण्यासाठी तुम्हाला स्वतःलाच प्रयत्न करणं आवश्यक आहे. विविध वर्तमानपत्रांमध्ये येणाऱ्या जाहिराती, प्लेसमेंट एजन्सीज आणि जॉब साइट्स, तसंच वैयक्तिक संपर्काच्या आधारे तुम्हाला अशा प्रकारे सुट्टीकालीन नोकरी मिळवता येईल.

आपण आपल्या मुलांची काळजी घेवू शकत नाही का किंवा त्यांचं संगोपन करण्यात आपण आर्थिकदृष्ट्या कमी पडतोय का असे अनेक प्रश्न, शंकाकुशंका या पालकांच्या मनात उभ्या राहतात. मात्र पालकांनी अशा प्रकारचे कोणतेही समज किंवा आपण आपल्या मुलांना सांभाळायला आर्थिकदृष्ट्या असमर्थ आहोत वगैरे कल्पना करून घेवू नयेत. समर जॉबमधून मुलांच्या करिअरला आणि जीवनाला दिशा मिळणार आहे, जीवनावश्यक अनेक कौशल्ये ते इथे शिकू शकतात हे पालकांनी समजून घ्यायला हवं. पैसे कमावण्यापेक्षा त्यांना ज्या क्षेत्रात करिअर करायचं आहे ते क्षेत्र जवळून अनुभवण्याची ही संधी आहे आणि मुख्य म्हणजे त्यांना स्वतःचा शोध घेणं यामुळे शक्य होईल. म्हणूनच पालक आणि मुलांनी समर जॉब करण्यामागचा उद्देश नीट समजून घेणं अतिशय महत्वाचं आहे. जीवनावश्यक कौशल्यं शिकून, जीवनाला दिशा देण्याचा दृष्टिकोन अशी नोकरी करण्यामागे असायला हवा.

अशा प्रकारे समर जॉब करताना दोन हेतू तुम्ही निश्चितच साध्य करू शकता. ते म्हणजे सुट्टीचा सदुपयोग करून आपण काहीतरी फलदायक काम केल्याचं समाधान आणि भविष्याच्या दृष्टीने करिअरची मोट बांधण्याची संधी. मग, वाट कसली बघता? उठा आणि या सुट्टीत कामाला लागा.

# जर तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर...

## प्रसिद्ध शास्त्रज्ञ स्वर्गीय श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी विद्यार्थ्यांना संबोधून केलेले प्रेरणादायक भाषण



मित्रांनो, जर तुम्हाला सूर्यासारखे तेजस्वी बनायला आवडत असेल तर प्रथम त्या सूर्यासारखे जळायला म्हणजे परिश्रम करायला शिका. या जगातील प्रत्येकजण स्वप्न बघतो मग ती एखादी लहान व्यक्ती असो किंवा मोठा माणूस असो. कारण देवाने मनुष्याची निर्मितीच यापद्धतीने केली आहे की तो नेहमी काहीना काही तरी स्वप्न बघत असतो. त्यापैकी काही व्यक्तींच्या स्वप्नांना अर्थ असतो तर काहींची स्वप्न अर्थहीन असतात.




परंतु ही स्वप्नेच आहेत जे प्रत्येक व्यक्तीचे भविष्य घडवितात. स्वप्नामुळे व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन होते. स्वप्ने एखाद्याला खूप यशस्वी आणि श्रीमंत बनवतात तर एखाद्या श्रीमंत व्यक्तीला रस्त्यावर आणतात. यश आणि अपयश हे दोन्ही शब्द आम्ही बघितलेल्या स्वप्नांद्वारेच येतात.


प्रसिद्ध शास्त्रज्ञ
स्टीफन हॉकिंग

रामानुजन, अल्बर्ट आइन्स्टाईन, स्टीफन हॉकिंग यांच्यासारखी जगात हजारो उदाहरणे आहेत जी अपंग आणि मंदबुद्धी म्हणून परिचीत होती आणि पुढे तीच मुले जगातील सर्वात महान शोधक बनले. ह्या व्यक्तींना संपूर्ण जगापासून वेगळे करणारे त्यांची स्वप्नेच होती. हजारो अडचणींशी सामना करत त्यांनी स्वत:ला या जगात स्थापित केले.

म्हणून मित्रांनो, जर तुमचे काही स्वप्न असेल आणि जर तुम्हाला या आकाशातील सूर्यासारखे तेजस्वी बनायचे असेल तर त्या सूर्याप्रमाणे जळायला सुद्धा शिका. कठोर परिश्रम आणि चिकाटी न करता काहीच साध्य केले जात नाही. परीक्षा असो किंवा जीवन – जर तुम्हाला उच्चस्थानी पोहोचायचे असेल तर तुम्हाला आळशीपणा सोडून द्यावा लागेल. सकाळी लवकर उठावे लागेल. आणि स्वत:लाच तयार करायचे की मला उच्चस्थानी पोहोचायचे आहे आणि फक्त आणि फक्त त्यावरच लक्ष केंद्रित केले पाहिजे. प्रत्येक गोष्ट – मोबाईल, इंटरनेट, टीव्ही, टाईमपास मित्र–मैत्रिणी आणि इतर ज्या ज्या गोष्टी तुम्हाला उच्चस्थानी पोहोचण्यासाठी त्रास देत असतील, त्या सर्वांचा त्याग केला पाहिजे.




तेव्हा तुम्ही कुठेतरी तेजस्वी व्हाल, त्या सूर्याप्रमाणे...

## आमची उद्दिष्टे

ज्ञानयज्ञ

- सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
- सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
- सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



बुंदे प्रियांशी मंगेश, भुसावळ – Science (FYJC)

मी लहान असतानाच वडीलांचे निधन झाले. आई एका खाजगी दवाखान्यात काम करते. मला पुढे जावून मेडीकलला प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यासाठी मी सायन्सला प्रवेश घेतला. पण सायन्स करायचे तर खाजगी शिकवणीसाठी असणारी फी फार जास्त होती आणि माझ्या आईला ते झेपावणारेही नव्हते. अशातच मला एसडी–सीडच्या शिष्यवृत्तीबद्दल कळाले व ती मिळालीही. त्यामुळे माझी आर्थिक अडचण थोड्या प्रमाणात कमी झाली.

शिष्यवृत्तीशिवाय एसडी–सीडमार्फत पर्सनल कौन्सीलिंगचे नियमित आयोजन केले जाते. त्याचा मला अकरावी सायन्सच्या अभ्यासात आणि पुढील मेडीकल प्रवेशासाठी अतिशय चांगला फायदा होत आहे. तज्ञ प्राध्यापकांकडून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे साईटी, निटसारख्या परीक्षांची चांगली तयारी होत आहे. आता या स्पर्धात्मक जगात टिकून राहू शकतो असा आत्मविश्वास मला निर्माण झाला आहे आणि हे सर्व शक्य झाले ते एसडी–सीडमुळेच. दादा, तुम्ही असेच सदैव आमच्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहा. मीही भविष्यात नोकरीला लागल्यावर माझ्याकडून होईल ती मदत नक्की करेल. धन्यवाद.



देवरे शुभम तानाजी, जळगाव – B.E. Mechanical (Third Year)

माझे वडील रिक्षा चालक आहेत. त्यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे आम्हाला अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातच माझे उच्च शिक्षण नागपूर येथे सुरू असल्यामुळे अतिरिक्त खर्च आहेच. कॉलेजची फी भरणे, नवीन पुस्तके विकत घेणे यासाठीदेखील मला फार अडचणी येत होत्या. अशातच मला मागील तीन वर्षांपासून एसडी–सीड शिष्यवृत्ती मिळत आहे. यामुळे मला कॉलेजची फी भरणे शक्य झाले.

मला मिळालेल्या बेनेफिशीअरी कार्डद्वारे मला स्टेशनरी, पुस्तके सवलतीच्या दरात मिळाली. एसडी–सीड शिष्यवृत्ती व त्यांच्या इतर सुविधांमुळे माझ्यासारख्या आर्थिक परिस्थितीने कमकुवत परंतु होतकरू व कष्टाळू विद्यार्थ्यांना त्यांचे इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी फार मोलाची मदत मिळत आहे. मा. दादांनी हा अतिशय चांगला उपक्रम आमच्यासारख्या तळागळातील मुलांसाठी सुरू केला आहे, त्याबद्दल खूप खूप आभार.



साखळकर गायत्री संजय – Commerce (SYJC)

माझी आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे शिक्षणात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तशातच पितृछत्र नसल्यामुळे मोठा आधार नाही. परंतु एसडी–सीडच्या रूपाने एक नवीन पितृछत्र मला लाभले हे मी माझे भाग्यच समजते. कारण त्यांच्याकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमुळे मला आर्थिक मदतच झाली असे नाही तर माझ्या प्रगतीमध्ये येणाऱ्या सर्व अडचणींना सामोरे जाण्याची मला जिद्द मिळाली.

माझे स्वप्न आहे की, ज्याप्रमाणे एसडी–सीड आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना मदत करते त्याचप्रमाणे मीही भविष्यात मदत करीन. मा. दादांना दिर्घायुष्य लाभो आणि त्यांचे पुढील आयुष्य सुखा–समाधानाने जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करते.



नन्नवरे तेजस किशोर, जळगाव – B.E. Electrical (First Year)

माझे वडील रंगकाम करतात तर आई गृहिणी आहे. इंजिनिअरींगला प्रवेश घ्यायची खूप इच्छा होती पण धाडस होत नव्हते कारण म्हणजे आर्थिक अडचण. अशातच मा. दादांच्या एसडी–सीड शिष्यवृत्तीबद्दल कळाले आणि आपली इच्छा आता पूर्ण होवू शकते यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. पुढे शिष्यवृत्ती मिळाली आणि इंजिनिअरींगला प्रवेशही झाला. त्याबद्दल मी मा. दादांचे आभार मानतो.

एसडी–सीडमार्फत राबविले जाणारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम, व्याख्याने, कार्यशाळा यांचादेखील मी नियमित लाभ घेत आहे. आणि त्या माध्यमातून माझ्यातील कौशल्य विकास होण्यासही मदत होत आहे. खरंच एसडी–सीड म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळच नव्हे तर आमचा सर्वांगीण विकास होईल अशी एक परिपूर्ण योजना आहे.


SD SEED

Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development

सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE:**

7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.

Tel: (0257) 2235254 I Fax: (0257) 2234258 I Website: www.sdseed.in